| MHLA150001122018 | | | |
|---|---|---|---|
| | प्राप्त दिनांक | : | ०३/०२/२०१८ |
| | नोंदणी दिनांक | : | ०३/०२/२०१८ |
| | निकाल दिनांक | : | ०१/०६/२०२६ |
| | कालावधी | : | ०८व. ०३म. २६दि. |

**भाग– अ**

फॉर्म क्र. XXXII

(न्यायनिर्णयाचे शिर्षक पान)

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (I))

| | | |
|---|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग न्यायालय क्र.१ चाकूर ता. चाकूर जि. लातूर यांचे न्यायालयात**<br>(पिठासीन अधिकारी – व्ही.एस. वाघमोडे यांच्या समोर.) | |
| | **नियमीत फौजदारी खटला क्र.१४/२०१८**<br>नि.क्र. ६६. | |
| फिर्यादी | महा. शासन द्वारा– पोलीस ठाणे चाकूर, ता. चाकूर जि. लातूर | |
| सहा. सरकारी अभियोक्ता | | श्रीमती पी.एस. भराडीया |
| आरोपी | १. | राहुल कांतराव वाघमारे,<br>वय – २२ वर्ष, |
| | २. | बालाजी कांतराव वाघमारे,<br>वय – २० वर्ष,<br>वरील दोन्ही रा. वाघोली ता. चाकूर जि. लातूर |
| | ३. | पद्माकर दामोदर जोगदंड,<br>वय – ३५ वर्ष, |
| | ४. | महादेव दामोदर जोगदंड,<br>वय – ३७ वर्ष,<br>आरोपी क्र. ३ व ४ रा. बरकत नगर, लातूर |

| | | |
|---|---|---|
| | ५. | चंद्रकांत गोविंद सन्मुखराव,<br>वय – २१ वर्ष,<br>रा. हारंगुळ ता. व जि. लातूर |
| आरोपींचे विधीज्ञ | | श्री. एस.व्ही. गंभीरे |

## भाग – ब

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेली तारीख | २१/१०/२०१७ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २२/१०/२०१७ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०३/०२/२०१८ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | ०७/१२/२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०७/१२/२०१९ |
| न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | –– |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०१/०६/२०२६ |
| जर, दोषसिध्दी झाली असेल तर शिक्षा फर्माविण्याचा दिनांक | – – |

## आरोपीचा तपशिल

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटकेचा दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हा कलम | दोषमुक्ती किंवा दोषसिध्दी | शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राहुल कांतराव वाघमारे | दि. २५.१०.२०१७ फौ.प्र.सं. कलम ४१–अ ची नोटीस | दि.२६.१०.२०१७ | भा दं वि कलम ४५२,१४३,१४७, १४८,३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | –– | –– |
| २ | बालाजी | दि. | दि.२६.१०. | भा दं वि कलम | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कांतराव वाघमारे | २५.१०.२०१७ फौ.प्र.सं. कलम ४१–अ ची नोटीस | २०१७ | ४५२,१४३,१४७, १४८,३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ३ | पद्माकर दामोदर जोगदंड | दि. २५.१०.२०१७ फौ.प्र.सं. कलम ४१–अ ची नोटीस | दि.२६.१०. २०१७ | भा दं वि कलम ४५२,१४३,१४७, १४८,३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ४ | महादेव दामोदर जोगदंड | दि. २५.१०.२०१७ फौ.प्र.सं. कलम ४१–अ ची नोटीस | दि.२६.१०. २०१७ | भा दं वि कलम ४५२,१४३,१४७, १४८,३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |
| ५ | चंद्रकांत गोविंद सन्मुखराव | दि. २५.१०.२०१७ फौ.प्र.सं. कलम ४१–अ ची नोटीस | दि.२६.१०. २०१७ | भा दं वि कलम ४५२,१४३,१४७, १४८,३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ प्रमाणे. | दोषमुक्त. | -- | -- |

## भाग 'क'

(क्रिमीनल मॅन्युअल अध्याय VI परिच्छेद क्र. ४४ (iii))

**अभियोगपक्ष/ बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी.**

**–अभियोगपक्ष –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०१ | सुनिल सुभाष कसबे | फिर्यादी |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०२ | नागनाथ मल्लीकार्जुन कल्याणे | पंच साक्षीदार |
| अभियोगपक्षाचा सा.क्र. ०३ | अनिल कुमार कसबे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |

ब– **–बचावपक्षाचे साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | -- | - |

क– **–न्यायालयीन साक्षीदार –**

| अनु.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस तज्ञ, वैद्यकीय, पंच आणि इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | -- | - |

अभियोगपक्ष/ बचावपक्ष / न्यायालय, यांचे निशाणी यादी

अ– **–अभियोगपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| १. | नि.क्र. ३ | प्रथम खबर अहवाल |
| २. | नि.क्र.४ | मुद्देमाल पावती |
| ३. | नि.क्र. २१ | फिर्याद |
| ४. | नि.क्र. ३० | साक्षीदार क्र. २ यांची सही |

ब – **–बचावपक्ष–**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क – –न्यायालयाचे निशाणी क्रमांक –**

| **अनु.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **तपशिल** |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**ड – न्यायालय निशाणी कागदपत्रांची यादी**

| अनु.क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| | -- | -- |

इ. **-भौतिक वस्तु-**

| अनु.क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | -- | -- |

**- न्यायनिर्णय -**

(पारीत दिनांक ०१.०६.२०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४५२, १४३, १४७, १४८, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ अन्वये अपराध केले बाबत खटला चालवण्यात आला.

अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे आहे.

२. दि.२१.१०.२०१७ रोजी सायंकाळी ०४.१५ वा. फिर्यादी सुनिल सुभाष कसबे हे त्यांची चुलती पार्वती, बहीण वैशाली, चुलती कौशल्या व चुलत भाऊ अनिल कुमार कसबे असे फिर्यादीच्या घरी बसले असतांना आरोपी हे सकाळी ०९.०० वा. झालेल्या किरकोळ बाचाबाचीच्या कारणावरुन सोबत कार क्र. एम.एच.०२ पी.ए.-७८९१ व दोन मोटार सायकल वर असे सात ते आठ जण हातात काठया, विटा, बॅट घेवून आले व फिर्यादी व इतरांना शिवीगाळ केली. धक्का बुक्कीने मारहाण केली, फिर्यादीला काठीने, विटाने, बॅटने पाठीत मारहाण केली. तसेच फिर्यादीचे चुलत भाऊ अनिल यांना काठयाने, विटाने मुका मार दिला. तसेच फिर्यादीच्या घरातील सामानाची तोडफोड करुन नुकसान केले. फिर्यादीचे चुलते गोविंद कसबे यांच्या घरातील कपाटाची मोडतोड करुन नुकसान केले, त्यामध्ये ठेवलेले सामान गहाळ झाले. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरोधात पोलीस ठाणे चाकूर येथे तक्रार दिली.

३. प्रस्तुतच्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे चाकूर येथे दि.२२.१०.२०१७ रोजी गु.र.क्रमांक ३१६/२०१७ भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२३, ५०४, ५०६, ४५२, ४२७ सह कलम १४९ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासी अधिकारी श्री. यु.एन. कांबळे, सहा. फौजदार पो.स्टे. चाकूर यांनी तपासादरम्यान घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले आणि तपास पूर्ण झालेनंतर आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. वरील गुन्हयास अनुसरुन मा. पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द दोषारोप नि.क्र.०७ नुसार ठेवून आरोपांचे स्वरुप समजावून सांगितले असता आरोपींनी त्यांच्यावरील आरोप नाकारुन खटला पुढे चालविण्याची विनंती केली व त्याबाबतचे निवेदन नि.क्र.०८ ते १२ वर दाखल आहे. आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणेचे बयाण नि.क्र. ५९ ते ६३ नुसार नोंदविण्यात आले.

५. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.२१.१०.२०१७ रोजी १६.१५ वा. मौजे वाघोली ता. चाकूर जि. लातूर येथे आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून फिर्यादी व साक्षीदार यांना दुखापत करण्याची पुर्व तयारी करुन फिर्यादीचे गृह अतिक्रमण केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ४५२ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय? | ..नकारार्थी |
| २. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम १४३ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून दंगा केला व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम १४७ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय? | ..नकारार्थी |
| ४. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून प्राणघातक शस्त्रासह दंगा केला व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम १४८ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय? | ..नकारार्थी |
| ५. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून ईच्छापुर्वक फिर्यादी व साक्षीदार यांना लाथा बुक्यांनी मारहाण केली व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ३२३ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाने शाबीत केली काय? | ..नकारार्थी |
| ६. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करुन त्यांना अपमानित केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०४ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ७. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून ईच्छापुर्वक फिर्यादी व साक्षीदार यांना जिवे ठार मारण्याची धमकी देऊन फौजदारीपात्र धाकदपटशा दाखविला व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ५०६ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |
| ८. | वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हे त्यांच्या समान उद्देशाच्या पुर्ततेकरीता बेकायदेशिर जमावाचे घटक बनून फिर्यादीच्या घरातील सामानाचे नुकसान केले व त्याद्वारे भा.दं.वि. चे कलम ४२७ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला, ही बाब अभियोग पक्षाने शाबीत केली काय ? | ..नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ९. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दे क्र. १ ते ८ करीता</u>** –

६. चर्चेची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दे क्र. १ ते ८ हे एकत्रीतरित्या चर्चेस घेण्यात आलेले आहेत.

७. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२०.१०.२०१७ रोजी सायंकाळी ०४.१५ वा. आरोपी बालाजी व राहुल वाघमारे व इतर सात आठ लोकांना एक जिप व मोटार सायकलवर घेऊन आले होते. ते सर्व सरळ घरात येऊन साक्षीदार क्र. १ यांना मारहाण करु लागले. त्या सर्व लोकांच्या हातामध्ये बॅट, विटा व काठया होत्या. आरोपी बालाजी यांनी बॅटने त्यांना पोटात व पाठीत मारले होते. आरोपी राहुल यांनी काठीने त्यांच्या पाठीत मारले होते. परंतू साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कथन केले आहे की, आरोपी बालाजी यांनी पोटात व पाठीत बॅटने मारले व आरोपी राहुल यांनी काठीने त्यांच्या पाठीत मारले होते, ही बाब त्यांनी पोलीसांना जबाब देतांना सांगितली होती. परंतू ती बाब त्यांच्या फौ.प्र.सं. कलम १६१ नुसारच्या नि.क्र. २१ मधील जबाबामध्ये नमुद नसण्याचे कारण त्यांना सांगता येत नाही. अशा परिस्थीतीमध्ये साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यामध्ये विसंगती निर्माण होते. सदर विसंगती साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यावर संशय निर्माण करते.

८. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात पुढे असे कथन केले की, आरोपी चंद्रकांत, महादेव व जोगदंड यांनी त्यांच्या पाठीत, पोटात, दंडावर मारहाण केली होती. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कथन केले की, ती बाब त्यांनी त्यांच्या फौ.प्र.सं. कलम १६१ च्या नि.क्र. २१ वरील जबाबामध्ये नमुद नसल्याचे कारण त्यांना सांगता येत नाही. तसेच साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या उलटतपासात हे मान्य केले की, आरोपी राहुल व बालाजी या

आरोपी व्यतिरिक्त ते इतर आरोपींना ओळखत नाहीत. नि.क्र. २१ व ३ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपी बालाजी व राहुल वाघमारे आणि इतर सात आठ अनोळखी व्यक्ती विरुध्द साक्षीदार क्र. १ यांनी तक्रार दिली होती. आरोपी चंद्रकांत, महादेव व जोगदंड यांनी मारहाणी केल्या बाबतची ओळख साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात केली आहे. सदर ओळख साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात कोणत्या आधारे देण्यात आली आहे याबाबत कांहीही नमुद केले नाही. सदर प्रकरणामध्ये इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांनी देखील वरील आरोपींची नांवे पुराव्यामध्ये नमुद केलेले आहेत. अशा परिस्थीतीमध्ये साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यावर आरोपी चंद्रकांत, महादेव व जोगदंड यांच्याविरुध्द कथीत केलेल्या मारहाणीबाबत विश्वास ठेवता येणार नाही व त्यामुळे साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यावर संशय निर्माण होतो.

९. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, साक्षीदार क्र. ३ यांना आरोपी चंद्रकांत, महादेव व राहुल यांनी काठीने व विटेने मारहाण केली होती. परंतू साक्षीदार क्र. ३ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, आरोपी बालाजी यांनी त्यांना विटेने मारहाण केली होती. परंतू त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये असे कथन केले की, ती बाब त्यांनी पोलीसांना जबाब देतांना सांगितली नव्हती. साक्षीदार क्र. १ व ३ यांचा वरील पुराव्याचा विचार केला असता साक्षीदार क्र. ३ यांना कोणी मारहाण केली होती, याबाबत विसंगती निर्माण होते. सदर विसंगती साक्षीदार क्र. १ व ३ यांच्या पुराव्यावर संशय निर्माण करते.

१०. आरोपीचे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, तक्रार देण्याकरीता एक दिवसाचा विलंब आहे व आरोपी आणि फिर्यादी यांच्यामध्ये पुर्व वैमनस्य असल्यामुळे साक्षीदार क्र. १ व ३ यांनी संगनमत करुन आरोपी विरुध्द खोटी तक्रार दिली आहे. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, मारहाणीची घटना दि. २१.१०.२०१७ रोजी ०४.१५ वा. घडली होती,

परंतू नि.क्र. २१ व ३चे अवलोकन केले असता घटनेची तक्रार साक्षीदार क्र. १ यांनी दि.२२.१०.२०१७ रोजी सायंकाळी ०३.५५ वा. दिली होती. अशा परिस्थीतीमध्ये तक्रार देण्याकरीता २४ तासांचा विलंब आहे. या विलंबाचे कारण साक्षीदार क्र. १ यांनी असे कथन केले की, पोलीसांनी त्यांना तुम्ही आज तक्रार देणार आहात का, त्यावर त्यांनी असे उत्तर दिले की, आज मार लागल्यामुळे चांगले वाटत नाही, उद्या तक्रार दिली तर चालेल का ? त्यावर पोलीसांनी त्यांना उद्या तक्रार दिली तर चालेल असे सांगितले होते. सदर कारण सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षातर्फे दाखल अंमलदार किंवा तपासी अंमलदार यांना या प्रकरणात तपासलेले नाही. तसेच साक्षीदार क्र. १ व ३यांना कथीत घटनेमध्ये मार लागला होता याबाबत सुसंगत असा वैद्यकीय पुरावा अभियोगपक्षातर्फे सिध्द करण्यात आलेला नाही. त्यामुळे साक्षीदार क्र. १ व ३ यांच्या पुराव्यावर संशय निर्माण होतो.

११. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, आरोपींनी त्यांना घरात येऊन मारहाण केली होती. परंतू सदर प्रकरणातील साक्षीदार क्र. २ घटनास्थळ पंच यांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा करण्यात आल्याची बाब पुर्णपणे नाकारली आहे. अभियोगपक्षातर्फे इतर घटनास्थळ पंचनाम्याचे साक्षीदार व तपासी अधिकारी यांना तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे अभियोगपक्षातर्फे घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यात आलेला नाही. अशा परिस्थीतीमध्ये घटनास्थळावर साक्षीदार क्र. १ यांचे घर आहे, ही बाब सिध्द करण्याकरीता दुजोरा देणारा पुरावा अभियोगपक्षातर्फे सिध्द करण्यात आलेले नाही. त्यामुळे साक्षीदार क्र.१ व ३ यांच्या पुराव्यावर निर्माण झालेला संशय अधिक दृढ होतो.

१२. साक्षीदार क्र. १ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, साक्षीदार क्र. १ यांच्या चुलत्या व बहीणी यांना देखील आरोपींनी मारहाण केली

होती. परंतू साक्षीदार क्र. १ यांच्या चुलत्या व बहीणी यांना सदर प्रकरणामध्ये तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे साक्षीदार क्र. १ व ३ यांच्या पुराव्याला दुजोरा देणारा साक्ष पुरावा अभियोगपक्षाने तपासले नसल्यामुळे साक्षीदार क्र. १ व ३ यांच्या पुराव्यावर निर्माण झालेली साशंकता अधिक दृढ होते. साक्षीदार क्र. ३ यांनी त्यांच्या उलटतपासात ही बाब मान्य केली आहे की, आरोपी व साक्षीदार क्र. १ फिर्यादी याचे जमत नाही. यावरुन साक्षीदार क्र. १ आणि आरोपीमध्ये पुर्व वैमनस्य आहे ही बाब सिध्द होते. साक्षीदार क्र. १ यांच्या पुराव्यातील विसंगती व निर्माण झालेला संशय आणि त्यांच्यामधील असलेले पुर्व वैमनस्य या बाबींचा विचार करता साक्षीदार क्र.१ यांच्या फक्त तोंडी पुराव्यावरुन आरोपी यांनी मारहाण केली होती ही बाब संशयापलीकडे सिध्द होत नाही.

१३. साक्षीदार क्र. १ व ३ यांच्या पुराव्यामध्ये विसंगती आहे. अभियोगपक्षातर्फे सदर प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार व इतर जखमी साक्षीदार यांना तपासण्यात आलेले नाही. तसेच दाखल अंमलदार व तपासी अधिकारी यांना प्रकरणात तपासण्यात आलेले नाही. अभियोगपक्षातर्फे घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यात आलेला नाही. तसेच अभियोगपक्षातर्फे महत्वाचे साक्षीदार वैद्यकीय अधिकारी यांना देखील या प्रकरणात तपासण्यात आलेले नाही. अभियोगपक्षातर्फे फिर्याद देण्याकरीता झालेल्या विलंबाचे कारण देण्यात आलेले नाही व ते वैद्यकीय अधिकारी आणि तपासी अधिकारी यांच्या मार्फत सिध्द करण्यात आलेले नाही.

१४. वरील चर्चेवरुन अभियोगपक्षातर्फे आरोपींनी वर नमुद गुन्हा केला, ही बाब अभियोगपक्षाला निःसंशयपणे शाबीत करता आली नाही. त्यामुळे मुद्दे क्र. १ ते ८ चे उत्तर नकारार्थी देण्यात येते. तसेच मुद्दा क्र.९ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | आरोपी राहुल कांतराव वाघमारे, बालाजी कांतराव वाघमारे, पद्माकर दामोदर जोगदंड, महादेव दामोदर जोगदंड, चंद्रकांत गोविंद सन्मुखराव |

| | |
|---|---|
| | यांना भारतीय दंड विधान कलम ४५२, १४३, १४७, १४८, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते. |
| २. | प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक वेळुची काठी व लाकडी बॅट मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे. |
| ३. | आरोपींनी पुर्वीच दिलेले वैयक्तिक बंधपत्र व जात मुचलका हे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–ए च्या तरतुदी करीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येत आहे. |
| ४. | (सदरहू न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.) |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIKAS SHIVAJI WAGHMODE
Date: 2026.06.01 16:24:31 +0530

दिनांक – ०१.०६.२०२६

(व्ही.एस. वाघमोडे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, चाकूर.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the stenographer | : | M. B. Pathan |
| Name of the Court | : | Civil Judge J.D. & J.M.F.C, Chakur. |
| Date of Order/ Judgment | : | 01/06/2026 |
| Order/Judgment signed by Presiding Officer on | : | 01/06/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 01/06/2026 |